
गणरायाची
(गणपतीची)
आरती

# गणरायाची आरती

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥१॥
जय देव, जय देव जय मंगलमूर्ती।
दर्शनमात्रे मन कामना पुरती ॥धृ॥
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुमकुम केशरा ।।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ॥२॥
॥ जय देव जय देव० ॥
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे, निर्वाणी रक्षावे, सुरवरवंदना ॥३॥
॥ जय देव जय देव० ॥

# गणरायाची आरती-2

शेंदुर लाल चढ़ायो अच्छा गजमुखको ।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरिहरको ।
हाथ लिए गुडलड्डु सांई सुरवरको ।
महिमा कहे न जाय लागत हूं पादको ॥१॥
जय जय श्री गणराज विद्या सुखदाता
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता,
जय देव जय देव ॥धृ० ॥
अष्टौ सिद्धि दासी संकटको बैरि ।
विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐबी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारि ॥२॥
॥ जय देव जय देव० ॥
भावभगत से कोई शरणागत आवे ।
संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ॥३॥
॥ जय देव जय देव० ॥

# गणपतीची आरती-3

दशास्त्रांमाजी तूं मंगलमूर्ती ।
अगणित महिमा तुझा कल्याण स्फूर्ती ॥
भक्तांलागी देसी विद्या अभिमत ती ।
मोरेश्वर नाम तुझे प्रसिद्ध या जगती ॥१॥
जय देव जय देव जय मोरेश्वरा ।
तुझा न कळे पार शेषा फणिवरा ॥ध्रु०॥
पुळ्यापश्ये नांदे महागणपती ।
माघ चतुर्थीला जनयात्रे येती ।।
जें जें इच्छिति तें तें सर्वही पावती ।
गणराजा मज बाळा द्यावी अभिमती ॥२॥
॥ जय देव जय देव० ॥
एकवीस दुर्वांकुरा नित्ये नेमेसी ।
आणूनि जे अर्पिती गणराजयासी ॥
त्याचे तू भवबंधन देवा चुकविसी ।
विठ्ठलसुत हा ध्यातो तुझिया चरणासी ॥
जय देव जय देव जय मोरेश्वरा ॥३॥
॥ जय देव जय देव० ॥

# गणपतीची आरती-4

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
तुझे गुण वर्णाया मज कैंची स्फूर्ती ॥ ध्रु० ॥
नानापरिमळ दूर्वा शमिपत्रें ।
लाडू मोदक अन्नें परिपूरित पातें ।
ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रें ।
अष्टहि सिद्धी नवनिधि देसी क्षणमात्रें ॥१॥
तुझे ध्यान निरंतर जे कोणी करिती ।
त्यांची सकलहि पापें विघ्नेंही हरती ॥
वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ।
सर्वहि पावुनि अंती भवसागर तरती ॥
जय देव० ॥ २ ॥
शरणागत सर्वस्वे भजती तव चरणीं ।
कीर्ति तयांची राहे जोंवर शाशितरणी ॥
त्रैयोक्यों ते विजयी अद्भुत हे करणी ।
गोसावीनंदन रत नामस्मरणीम ॥
जय देव जय देव० ॥३॥

# गणपतीची आरती-5

तूं सुखकर्ता तूं दुःखकर्ता विघ्नविनाशक मोरया ।
संकटीं रक्षीं शरण तुला मी, गणपतीबाप्पा मोरया ॥ ध्रु० ॥

मंगलमूर्ति तूं गणनायक ।
वक्रतुंड तूं सिद्धिविनायक ॥
तुझिया द्वारीं आज पातलों ।
नेईं स्थितिप्रति राया ॥ संकटीं० ॥१॥

तूं सकलांचा भाग्यविधाता ।
तूं विद्येचा स्वामी दाता ॥
ज्ञानदीप उजळून आमुचा ।
निमवीं नैराश्याला ॥ संकटीं० ॥२॥

तूं माता, तुं पिता जगं या ।
ज्ञाता तूं सर्वस्व जगीं या ॥
पामर मी स्वर उणें भासती ।
तुझी आरती गाया ॥ संकटीं ॥३॥

# गणपतीची आरती-6

नाना परिमळ दूर्वा शेंदूर शमिपत्रें ।
लाडू मोद्क अन्ने परिपूरित पात्रें ।।
ऐसे पूजन केल्या बीजाक्षरमंत्रे ।
अष्टहि सिद्धी नवनिधी देसी क्षणमात्रें ।। १ ।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
तुझे गुण वर्णाया मज कैची स्फूर्ती ।। ध्रु० ।।
तुझे ध्यान निरंतर जे कोणी करिती ।
त्यांची सकलही पापे विघ्नेंही हरती ।।
वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती ।
सर्वहि पावती अंती भवसागर तरती ।। २ ।।
॥ जय देव जय देव० ॥
शरणांगत सर्वस्वें भजती तव चरणी ।
कीर्ती तयांची राहे जोवर शशितरणि ।।
त्रैलोक्यी ते विजयी अदभूत हे करणी ।
गोसावीनंदन रत नामस्मरणी ।। ३ ।।
॥ जय देव जय देव० ॥

# वेदशास्त्रांमाजी तूं मंगलमूर्ती

वेदशास्त्रांमाजी तूं मंगलमूर्ती।
अगणित महिमा तुझा कल्याण स्फूर्ती॥
भक्तांलागी देसी विद्या अभिमत ती।
मोरेश्वर नाम तुझे प्रसिद्ध या जगती ॥१॥
जय देव जय देव जय मोरेश्वरा।
तुझा न कळे पार शेषा फणिवरा ॥ध्रु० ॥
पुळ्यापश्ये नांदे महागणपती।
माघ चतुर्थीला जनयात्रे येती।।
जें जें इच्छिति तें तें सर्वही पावती।
गणराजा मज बाळा द्यावी अभिमती ॥२॥
॥ जय देव जय देव० ॥
एकवीस दुर्वांकुरा नित्ये नेमेसी।
आणूनि जे अर्पिती गणराजयासी॥
त्याचे तू भवबंधन देवा चुकविसी।
विठ्ठलसुत हा ध्यातो तुझिया चरणासी॥
जय देव जय देव जय मोरेश्वरा॥३॥
॥ जय देव जय देव० ॥

Hi! We're PDFSeva. A dedicated portal where one can download any kind of PDF files for free, **with just a single click**.

PDFSeva.com